## प्रेस नोट

ला.प्र.वि.,वाशिम.
दि. ३०/१२/२०२१

आरोपी लोकसेवक क्र.१) श्री. अशोक रामाजी पागडे वय 40 वर्ष, व्यवसाय–शाखा व्यवस्थापक,विदर्भ कोकण ग्रामीण बॅंक शाखा मांगुळ झनक ता.रिसोड जि.वाशिम रा.ह.मु. केशवराव बोरक मु.वडजी पोस्ट मांगुळ झनक मुळ रा. महाराणा प्रताप वार्ड पोस्ट बल्लारपुर ता.बल्लारपुर जि.चंद्रपुर आरोपी क्र.२) सौ. प्रतिभा तेजराव गायकवाड वय ३६ वर्षे,रा.गौंढाळा ता.रिसोड जिल्हा वाशिम यांना १८,०००/- रुपयेची यशस्वी सापळा प्रकरणात गुन्हा नोंद बाबत.

| | |
|---|---|
| आरोपी नांव हुद्दा, व पत्ता | क्र.१)आलोसे श्री. अशोक रामाजी पागडे वय 40 वर्ष, व्यवसाय–शाखा व्यवस्थापक,विदर्भ कोकण ग्रामीण बॅंक शाखा मांगुळ झनक ता.रिसोड जि.वाशिम रा.ह.मु. केशवराव बोरक मु.वडजी पोस्ट मांगुळ झनक मुळ रा. महाराणा प्रताप वार्ड पोस्ट बल्लारपुर ता.बल्लारपुर जि.चंद्रपुर क्र.२) आरोपी सौ. प्रतिभा तेजराव गायकवाड वय ३६ वर्षे,रा.गौंढाळा ता.रिसोड जिल्हा वाशिम |
| लाच रक्कम | १८,०००/-रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांना त्यांची जिल्हा उदयोग केंद्र वाशिम मार्फत मंजूर झालेल्या कर्जाचे २ लाख रुपये बॅंक खात्यात जमा करण्याकरीता आरोपी यांनी तक्रारदारास लाचेची मागणी केली. |
| सापळा अधिकारी | गजानन आर शेळके, पोलीस उपअधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम. |

तक्रारदार यांना त्यांची जिल्हा उदयोग केंद्र वाशिम मार्फत मंजूर झालेल्या कर्जाचे २ लाख रुपये बॅंक खात्यात जमा करण्याकरीता आलोसे हे २०,०००/-रु लाचेची मागणी करीत असल्याबाबत तक्रारदार यांनी दिनांक २९.१२.२०२१ रोजी ला.प्र.वि.वाशिम येथे तक्रार दिली.

सदर तक्रारीवरुन दि. २९/१२/२०२१ रोजी पडताळणी कार्यवाही दरम्यान आलोसे व आरोपी क्र.२ यांनी तक्रारदार यांना त्यांची जिल्हा उदयोग केंद्र वाशिम मार्फत मंजूर झालेल्या कर्जाचे २ लाख रुपये बॅंक खात्यात जमा करण्याकरीता २०,०००/-रु लाचेची मागणी केल्याचे निषन्न झाले..

दि. ३०/१२/२०२१ रोजी यशस्वी सापळा कारवाई दरम्यान आरोपी क्र.२ सौ. प्रतिभा तेजराव गायकवाड वय ३६ वर्षे,रा.गौंढाळा ता.रिसोड जिल्हा वाशिम यांनी विदर्भ कोकण ग्रामिण बॅंक शाखा मांगुळ झनक समोर पंचासमक्ष तक्रारदार यांना लाचेची मागणी करुन लाच रक्कम १८,०००/-रु स्विकारले. वरुन आरोपी क्र.२ यांचे कडुन पंचासमक्ष लाचेची रक्कम जप्त करुन आलोस आरोपी क्र.१ व आरोपी क्र.२ यांना ताब्यात घेण्यात आले आहे. आलोसे आरोपी क्र.१ व आरोपी क्र२ यांचे विरुध्द तक्रारदार यांचे फिर्याद वरुन पोलीस स्टेशन शिरपुर जि. वाशिम येथे गुन्हा नोंदविण्याची कार्यवाही चालु आहे.

सदर कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक श्री. विशाल वि. गायकवाड, मा.अपर पोलीस अधिक्षक अरुण सावंत, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती, यांचे मार्गदर्शनात पोलीस उपअधिक्षक गजानन आर. शेळके पोलीस ,पो.नि.एस.यु.कांबळे,पो.नि.श्रीमती अफुने, व अंमलदार पोहवा.नितीन टवलारकर, अरविंद राठोड,आसिफ शेख,योगीता गायकवाड पोना.योगेश खोटे,विनोद अवगळे,चानापोकॉ मिलींद चन्नकेशला ला.प्र.वि. वाशिम यांनी केली आहे.

शासकीय लोकसेवकाने किंवा खाजगी इसमाने शासकीय काम करुन देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास त्याबाबत खालील क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन श्रीमती अफुने, पोलीस निरीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम यांनी केले आहे.

30/12

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,वाशिम दुरध्वनी क्रमांक-०७२५२/२३५९३३
टोल फ्रि.नं. - १०६४
गजानन आर शेळके.-९४२३३३८४२४

(गजानन आर.शेळके)
पोलीस उपअधिक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग वाशिम

कार्यालय पोलीस उपअधिक्षक अँन्टी करप्शन ब्युरो वाशिम
सत्यमेव जयते

Scanned by TapScanner